फोन नं. (02164) 272414, 8275706613
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in, principal.gcoekarad@dtemaharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन
**शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड**
*(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)*
विद्यानगर, कराड पिन — ४१५१२४ जि. सातारा

जा.क्र.शाअक/डिनॲकेडमिक/२०२४-२०२५/ ३७७ — दिनांक:- ०९/०९/२०२४

## प्रथम वर्षात (Against CAP) प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सूचना :-

**१.महाविद्यालयाचे प्रवेश शुल्क बाबत :-**

१. मागासप्रवर्गातील अनु.जाती (SC)/ मधील ज्या विद्यार्थ्यांचे पालकांचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न (सन २०२३-२४) मधील रुपये २,५०,०००/- (रुपये दोन लाख पन्नास हजार फक्त ) पर्यत आहे. अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे फी स्ट्रक्चर प्रमाणे फी सवलत मिळेल.**(मा.तहसिलदार यांचा सन २०२३-२४ मधील उत्पन्नाचा दाखला आवश्यक आहे.)**

२. मागासप्रवर्गातील भटक्या विमुक्त जाती/जमाती(व्ही.जे.एन.टी) इतर मागासप्रवर्ग (ओबीसी) विशेष मागासप्रवर्ग (एसबीसी) मधील ज्या विद्यार्थ्यांचे पालकांचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न (सन २०२३-२४) मधील रुपये १,५०,०००/- (रुपये एक लाख पन्नास हजार फक्त ) पर्यत आहे अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचे फी स्ट्रक्चर प्रमाणे फी सवलत मिळेल.**(मा.तहसिलदार यांचा सन २०२३-२४ मधील उत्पन्नाचा दाखला आवश्यक आहे.)**

३. खुल्या प्रवर्गातील (ओपन) मधील सर्व विद्यार्थ्यांना उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक ३१/०३/२०१६ च्या शासन निर्णयाअन्वये संस्था स्तरावरील प्रवेशाकरीता ई.बी.सी. सवलत देय राहणार नाही. सबंधीताना महाविद्यालयाचे फी स्ट्रक्चर प्रमाणे **खुल्या प्रवर्गाची संपूर्ण फी भरावी लागेल.**

४.अनु.जमाती **(ST)** प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिनांक १७/०१/२०२२ रोजीचे शासन निर्णयानुसार फ्रीशीप योजना लागू आहे.

**२. प्रवेशासाठीचे मूळ कागदपत्रां बाबत :-**

१.केंद्रीयभुत प्रवेश प्रक्रियेअतर्गत प्रवेश निश्चित करते वेळी अपलोड केलेली संपूर्ण मूळ कागदपत्रे ही प्रवेश घेतेवेळी सादर करणे आवश्यक आहेत.व ती स्वतः जवळ नसतील तर हमीपत्र भरुन देणे व सदरची कागदपत्रे दिलेल्या विहीत मुदतीतच सादर करणे आवश्यक आहे.

**३.मागासप्रवर्गातील सवलतीस पात्र असणा-या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती हमीपत्र भरुन देणे बंधनकारक आहे.**

**४.प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थी विभागात उपस्थित राहून एम.आय.एस. मध्ये रजिस्ट्रेशन करुन रजिस्ट्रेशन नंबर व ओळखपत्रासाठी फोटो स्कॅन करुण देणे आवश्यक आहे.**

Govt. College of Engineering, Karad ★Dist. Satara 415124★

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड

प्रत :- महाविद्यालयाचे संकेत स्थळावर प्रदर्शित करणे करीता